**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**नगरसचिव विभाग**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०२**

नगरसचिव कार्यालय
दिनांक -२८/०४/२०२३

प्रति,
मा. ---------------------------------------
स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.०२ मंगळवार दि.०२/०५/२०२३ रोजी दुपारी-१ वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, छ.संभाजीनगर रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण प्रत्यक्ष उपस्थीतीने सहभागी व्हावे अशी विनंती आहे.

सही /-
(एन.के.देशमुख)
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**मंगळवार दिनांक -०२ /०५ /२०२३ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १९ | अहमदनगर महानगरपालिका ई-निविदा क्र.८७९६३८ स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा तयार केलेला पुर्णाकृती पुतळा अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी प्रभागातील प्रोफेसर चौक येथील न.र.यो.क्र.४ अं.भु.क्र.१२९ पैकी महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत उभारणेकामी चबुतरा तयार करणे व सुशोभिकरण करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
(एन.के.देशमुख)
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत** - विषय क्रमांक- १९ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०२**

**विषय क्रमांक - १९** **दिनांक- ०२ /०५/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका ई-निविदा क्र.८७९६३८ स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा तयार केलेला पुर्णाकृती पुतळा अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी प्रभागातील प्रोफेसर चौक येथील न.र.यो.क्र.४ अं.भु.क्र.१२९ पैकी महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत उभारणेकामी चबुतरा तयार करणे व सुशोभिकरण करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग.

उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकीय मान्यता - मा.आयुक्त यांची दि.२४/०२/२०२३
२.ई-निविदा क्र.८७९६३८ सन २०२२-२०२३
३.निविदा विक्री कालावधी - ०२/०३/२०२३ ते दि-१६/०३/२०२३
४.निविदा स्विकारणेचा कालावधी दि.०२/०३/२०२३ ते दि.१६/०३/२०२३
५.निविदा उघडण्याचा दिनांक- २०/०३/२०२३
६.कामाची मुदत- ४ महिने
७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल- दि.११/०३/२०२३ च्या तांत्रिक छाननीनुसार

| **निविदा क्रमांक** | **कामाचे नाव** | **निविदा रक्कम (GST व्यतिरिक्त)** | **निविदा दाखल करणारे ठेकेदार** | **निविदेमध्ये भरलेला निविदा दर** | **सर्वात कमी दराची निविदा व त्यांचा दर** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| ई.निविदा क्र.- 879638 सन 2022-2023 | ई.नि.क्र 879638 स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा तयार केलेला पुर्णाकुती पुतळा अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी भागातील प्रोफेसर चौक येथील न.र.यो.क्र 4 अं.भु.क्र 129 पैकि महानगरपालिकेच्या मालकिच्या जागेत उभारणे कामी चबुतरा तयार करणे व सुशोभिकरण करणे. | 28,84,444/- | श्री.राहुल साहेबराव बोरुडे, अ.नगर | निविदा दराने | श्री.राहुल साहेबराव बोरुडे, अ.नगर<br><br>निविदा दराने |
| | | | श्री.सुनिल रामराव राउत अ.नगर | निविदा दरापेक्षा 2% ज्यादा दराने | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्ट्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदाधारक श्री.राहुल साहेबराव बोरुडे, अहमदनगर यांची निविदा निविदा दराने आलेली असुन ती सर्वात कमी दराची आहे. तरी उक्त बाब विचारात घेवुन निविदाधारक श्री.राहुल साहेबराव बोरुडे, अहमदनगर यांची निविदा निविदा दराने मंजुरीस्तव सविनय सादर. सदर कमी दराची ई-निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समितीकडेस पाठविणेस सादर./'अ'.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर लेखापरिक्षक व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केलेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ७३(क) नुसार कार्यवाही करणे उचित राहील.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, 'अ' मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका ई-निविदा क्र.८७९६३८ स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा तयार केलेला पुर्णाकृती पुतळा अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी प्रभागातील प्रोफेसर चौक येथील न.र.यो.क्र.४ अं.भु.क्र.१२९ पैकी महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत उभारणेकामी चबुतरा तयार करणे व सुशोभिकरण करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.सभापती साहेबः- अहमदनगर शहरातील अमृत पाणी योजना चालु झालेली आहे काय? याबाबत माहिती देण्यात यावी.

जल अभियंता श्री.निकमः- अहमदनगर शहराकरीता चालु असणारी अमृत पाणी योजना टेस्ट घेण्याचे काम चालु आहे. दोन ठिकाणी लिकेज आढळून आल्याने लिकेज काढण्याचे काम चालु आहे.

मा.सभापती साहेबः- अहमदनगर शहरामध्ये मुख्यत्वेय आमच्या नालेगाव भागामध्ये पाणी येत नाही.

जल अभियंता श्री.निकमः- आपल्या तक्रारी प्रमाणे सदरची लाईन खराब झालेली असेल किंवा चोकअप झालेली असल तर पाहुण घेतो. तसेच महावितरण करुन वेळोवेळी लाईट सपलाय जातो. लाईट आल्यानंतर पाणी परिस्थिती पुर्ववत होण्यासाठी साधारणता दोन ते अडीच तासाचा कालावधी जातो.

मा.सभापती साहेबः- महावितरणच्या लाईट चालु बंद परिस्थिती बाबत पाणी पुरवठा विभागाने प्रेस नोट देण्यात यावी.

मा.श्री.संपत बारस्कर साहेबः- अमृत पाणी योजनेकरीता आम्ही अनेक वेळा निविदन दिलेले आहे व आंदोलन ही केलेले आहे. माझा प्रभाग हा दिवसेन दिवस वाढत्या नागरीवस्तीचा प्रभाग होत आहे. प्रभागामध्ये पाणी प्रश्न ज्वलंत आहे. अमृत योजनेची आमच्या भागातुन मुख्य पाईपलाईन गेलेली आहे. महानगरपालिका हद्दीबाहेर अमृत योजनेवरुन लाईन टाकुन देवु नका. आमच्या भागातुन लाईन गेल्यातरी आम्हाला कनेक्शन देत नाही. जर अमृत योजनेवरुन कनेक्शन देणार नसाल तर आमच्या प्रभागातील नागरिकांसाठी पाणी पुरवठा कशा पध्दतीने करणार या बाबत प्रशासनाने माहिती द्यावी.

जल अभियंता श्री.निकमः- अमृत योजनेची लाईन बायपास मार्गे जाणार होती. ती वडगाव वरुन आणण्यात आली.या भागातील पाणी पुरवठ्याबाबत माहिती घेतली असता. अमृत योजनेवरुन पाणी देण्याचे ठरले होते.

मा.उपायुक्त (कर) श्री.डांगे साहेबः- अमृत योजनेची टेस्टींग झाल्यानंतर परिस्थिती पाहुन निर्णय घेवु.

मा.सभापती साहेबः- अमृत योजनेची टेस्टींग झाल्यानंतर सदर भागात पाणी पुरवठा व्यवस्थित होईल का?

जल अभियंता श्री.निकमः- ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या लाईनवरुन पाणी पुरवठा करण्यात येत होता. परंतु, जिल्हा परिषद यांनी त्यांच्या पाईपलाईन वरील टॅपिंग बंद केल्याने पाणी पुरवठा करता येत नाही. सद्यस्थितीत सदर ठिकाणी मनपाचे व खाजगी टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

मा.उपायुक्त (कर) श्री.डांगे साहेबः- मा.श्री.संपत बारस्कर,नगरसेवक यांचे मागणी प्रमाणे महासभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- या विषयाची सविस्तर माहिती शहर अभियंता श्री.मनोज पारखे साहेब सांगा.

मा.शहर अभियंता श्री.मनोज पारखेः- छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा प्रोफेसर कॉलनी चौक येथे बसविणे आहे. सदर पुतळ्याकामी लागणारा चौथरा बनविणे कामी ची निविदा मंजुरीसाठी आलेली आहे. पुतळा बसविणे कामी लागणा-या पोलीस प्रशासन, कला संचनालय यांची मंजुरी मिळालेली असुन नगरविकास विभागाची मंजुरी मिळणे बाकी आहे. सदर कामी पत्रव्यवहार व पाठपुरावा केलेला आहे. पुतळा तयार आहे. फक्त नगरविकास खात्याची मंजुरी येणे बाकी आहे. प्रोफेसर कॉलनी चौकामध्ये उत्तर पुर्व कोप-यात चौथरा तयार करुन त्यावर पुतळा बसवावयाचा आहे. तसेच आजुबाजुच्या रिकाम्या जागेमध्ये उद्यान व सुशोभिकरण करणेकरीता ई-निविदा प्रसिध्दा करण्यात आली होती. या कामाकरीता निविदाधारक श्री.राहुल साहेबराव बोरुडे, अहमदनगर यांची निविदा निविदा दराने आलेली असुन या सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्याकरीता सदरचा विषय सभेपुढे ठेवलेला आहे.

मा.सभापती साहेबः- छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा बसविणे बाबत माझे मामा तत्कालीन नगरध्यक्ष नगरपालिका स्व.सुरेशजी शेळके यांनी नेप्ती नाका चौकामध्ये सदरचा पुतळा बसविणेबाबतची संकल्पना मांडली होती. तत्कालीन नगरपालिका व महानगरपालिका सभागृहात ठराव देखील मंजुर केले होते. याकरीता त्यांनी खुप प्रयत्न केले होते. परंतु त्याठिकाणावरुन राज्य मार्ग गेल्याने सदर पुतळा बसविणेकामी परवानग्या मिळत नव्हत्या यास्तव त्यांनी त्या चौकाला स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज असे नामकरण करण्यात आले. त्यानंतर काल ज्याठिकाणी स्व.बाळासाहेब ठाकरे आपले दवाखाना उद्घाटन झाले त्या इमारतीला देखील स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज असे नामकरण करण्यात आले. स्व.कैलासमामा गिरवले यांच्या संकल्पनेतुन प्रोफेसर कॉलनी चौकामधील जागा अंतिम करण्यात आली. महानगरपालिका प्रशासकीय आवारामध्ये बसविण्यात येणारा छत्रपती शिवाजी महाराज व प्रोफेसर कॉलनी चौकामध्ये बसविण्यात येणारा छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा आमच्या कार्यकाळात बसवला जात आहे. याचा आम्हाला आनंद होत आहे.

तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले या महापुरुषांचे पुतळे बसविणे बाबतचे काम तातडीने करण्यात यावे.

मा.श्री.संपत बारस्कर साहेबः- पुतळे बसविण्याचे काम प्रगती पथावर असल्याने त्याच्या सुरक्षते करीता महानगरपालिकेने त्याठिकाणी कर्मचारी नेमणुक करावी.

मा.श्री.संपत बारस्कर साहेबः- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.प्रदीप परदेशी साहेबः- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महानगरपालिका ई-निविदा क्र.८७९६३८ स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा तयार केलेला पुर्णाकृती पुतळा अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी प्रभागातील प्रोफेसर चौक येथील न.र.यो.क्र.४ अं.भु.क्र.१२९ पैकी महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत उभारणेकामी चबुतरा तयार करणे व सुशोभिकरण करणे या कामाकरीता निविदाधारक श्री.राहुल साहेबराव बोरुडे, अहमदनगर यांची निविदा निविदा दराने आलेली असुन या सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर बांधकामाचे भुमीपुजन स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीचे अवचित्य साधुन दिनांक-१४ मे २०२३ रोजी असुन याच दिवशी भुमीपुजन कार्याक्रम आयोजित करण्यात यावा. याबाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. सदर कामासाठी येणा-या खर्चास याच सभेत मान्यता देण्यात येत आहे.

सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार मा.श्री.संपत बारस्कर,सदस्य स्थायी समिती, नगरसेवक यांचे पाणी प्रश्नाबाबत केलेल्या मागणी प्रमाणे महासभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात यावा.

**ठरावः-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका ई-निविदा क्र.८७९६३८ स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा तयार केलेला पुर्णाकृती पुतळा अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी प्रभागातील प्रोफेसर चौक येथील न.र.यो.क्र.४ अं.भु.क्र.१२९ पैकी महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत उभारणेकामी चबुतरा तयार करणे व सुशोभिकरण करणे या कामाकरीता निविदाधारक श्री.राहुल साहेबराव बोरुडे, अहमदनगर यांची निविदा निविदा दराने आलेली असुन या सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर. खर्च मंजुर.

सदर बांधकामाचे भुमीपुजन स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीचे अवचित्य साधुन दिनांक-१४ मे २०२३ रोजी असुन याच दिवशी भुमीपुजन कार्याक्रम आयोजित करण्यात यावा. याबाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. सदर कामासाठी येणा-या खर्चास याच सभेत मान्यता देण्यात येत आहे.

सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार मा.श्री.संपत बारस्कर,सदस्य स्थायी समिती, नगरसेवक यांचे पाणी प्रश्नाबाबत केलेल्या मागणी प्रमाणे महासभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.संपत बारस्कर-सही/-

अनुमोदक :- मा.श्री.प्रदिप परदेशी-सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका